औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची मंगळवार दि. ४. १. ९४ रोजी झालेल्या ८९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

---

बैठकीस हजर असलेले पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वरराव भोसीकर | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २] श्री. भास्कर मुंढे | उपसभापती औरंगाबाद मंडळ. |
| ३] श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबन चारठाणकर | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ४] श्री. गोविंद गारे, प्रशासक, महानगरपालिका, औरंगाबाद. | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ५] श्री. दे. हि. मुन, उपसंचालक, नगररचना विभाग, औरंगाबाद. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |

नुतनवर्षाच्या उपस्थित पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देऊन मंडळाच्या बैठकीस सुरुवात करण्यांत आली.

विषय क्र. १: दिनांक ३०. ११. ९३ रोजी झालेल्या ८८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

---

[१] तीसगांव येथील मंडळाच्या ताब्यातील जमिनीवर गृहनिर्माण योजना राबविण्याच्या संदर्भात येणाऱ्या अडचणी विषयी चर्चा करण्यांत आली त्यात प्रामुख्याने स्टोन क्रशरच्या धुळीमुळे होणाऱ्या परिणामाबाबत सांगोपांग चर्चा झाली. याविषयी उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, जिल्हाधिकारी, एस. डी. ओ, औरंगाबाद यांच्याकडे बैठका झालेल्या आहेत. स्टोन क्रशरधारकांना लिज वाढवुन दिलेला नाही. स्टोन क्रशरधारकांना पर्यायी जागा सुध्दा दाखविली आहे. सदर जागा अजुन स्टोन क्रशरधारकांनी ताब्यात घेतलेली नाही असे कळते उपसभापतींनी सांगितले. तसेच हा भाग निवासी क्षेत्रात येतो त्यामुळे स्टोन क्रशर हलविणे हे जरुरीचे आहे. यास्तव नुतन जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतल्याचे उपसभापतींनी सांगितले. याविषयावर जिल्हाधिकाऱ्याशी चर्चा झाली व त्यांनी २६ जानेवारी ९४ पर्यन्त थांबावे असे सांगितले आहे.

यावर मंडळाच्या सदस्यांनी मतप्रदर्शित केले की, तीसगांव येथील गृहनिर्माण योजना राबवावी व योजना कार्यान्वीत झाल्यानंतर पुर्णत्वासाठी जवळ जवळ दिड ते दोन वर्षाचा कालावधी लागेल व या कालावधीत स्टोन क्रशर उठविण्याची कार्यवाही करावी. तसेच लाभधारकांचाही दबाव निर्माण होईल.

यावर चर्चेअंती असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५३३          दिनांक ४.१.९४

"तीसगांव येथील गृहनिर्माण योजना त्वरीत सुरु करावी."

[२] मंडळाच्या ८८ व्या बैठकीतील आयत्यावेळचा विषय क्र. १ व ठराव क्र. ५३२ वर चर्चा करतांना श्री. व्यंकटराव देशपांडे सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, मंडळाच्या कार्यालयाचे रक्षणाची जबाबदारी खाजगी सेक्युरिटी संस्थेकडे ठराव क्र. ५३२ अन्वये सोपविण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. या ठरावाचा फेरविचार करण्याची गरज आहे व कार्यालयाच्या रक्षणासाठी दोन चौकीदारांची रिक्त पदे भरण्यात यावी व त्यासाठी प्राधिकरणाकडे पाठपुरावा करावा असे श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरु चारठाणकर सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले.

या विषयी उपसभापतींनी सांगितले की, रिक्त पदे भरण्याचे अधिकार प्राधिकरणाकडे आहेत. करिता त्याची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

चर्चेत भाग घेतांना आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सांगितले की, मंडळाच्या कार्यालयाची रक्षणाची जबाबदारी खाजगी सेक्युरिटी संस्थेकडे दिल्यास मंडळाच्या आस्थापनेवरील २ पदे जातील व त्यामुळे पुन्हा लवकर पदे मंजूर होणार नाही. म्हणून २ पदे भरण्यासाठी प्राधिकरणाकडे पाठपुरावा करावा. तसेच माजी सैनिकाची चौकीदार म्हणून नेमणूक केल्यास ते ही सोयीस्कर होईल. कारण त्यांना मिळणारे पेन्शन वजा जाता त्यांना वेतन द्यावे लागेल म्हणजे १००० ते १२०० पर्यन्त वेतन होईल. तसेच या विषयी जिल्हा सैनिक बोर्ड, औरंगाबाद येथे ही अधिक माहिती मिळू शकेल.

यावर चर्चा करतांना मंडळाच्या सदस्यांनी सांगितले की, खाजगी सेक्युरिटी संस्थेकडे कार्यालयाच्या रक्षणाची जबाबदारी न सोपविता त्यासाठी

चौकीदाराचे पदे भरण्यात यावी.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५३४ — ४.१.९४

यापुर्वी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ५३२ रद्द करण्यांत येत आहे.

औरंगाबाद मंडळाच्या कार्यालयाची रक्षणाची जबाबदारी पार पाडण्यासाठी चौकीदाराचे पदे भरण्यासाठी प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करावा.

....

दिनांक ३०.११.९३ रोजी झालेल्या ८८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतिवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५३५ — दिनांक ४.१.९४

दिनांक ३०.१०.९३ रोजी झालेल्या ८८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन सदरचा कार्यवृत्तांत वरीलप्रमाणे कायम करण्यांत आला.

विषय क्र,२: औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत आलेल्या झोपडपट्टी सुधारणा कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी उपसभापतींनी वाचुन दाखविली. संसारनगर या झोपडपट्टीतील सुधारणा कामाचे अंदाजपत्रके रु. २,८०,७०५/- रुपये असुन नियमाप्रमाणे त्यास रु. २,६२,२४५/- रुपयाची प्रशासकीय मान्यता प्रदान करता येईल असे उपसभापतींनी सांगितले.

यावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५३६ — दिनांक ४.१.९४

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे, संसारनगर या झोपडपट्टीतील सुधारणा कामाचे रु. २,८०,७०५/- चे अंदाजपत्रक प्राप्त झाले. त्यास नियमानुसार रु. २,६२,२४५/- प्रशासकीय मान्यता, जिल्हा नियोजन व विकास मंडळाने उपलब्ध केलेल्या निधीच्या उपलब्धतेनुसारच प्रतिपुर्ती करण्याच्या व जुन्या कामांना प्राधान्य देण्याच्या अटीवर देण्यात येत आहे.

विषय क्र. ३: सन १९९३-९४ या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक व सन १९९४-९५ या वर्षाचे प्रस्तावीत अंदाजपत्रक.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५३७ दिनांक ४. १. ९४

सन १९९३-९४ या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक, सन १९९४. ९५ या वर्षाचे प्रस्तावित अंदाजपत्रक मंडळाने मंजूर केले.

विषय क्र. ४: मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र. १: औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अविष्कार तथा लगतच्या योजनेच्या बाह्य सुविधांचे उन्नतीकरण करण्याकरिता रु. ४४.०० लाखाचे अनुदानाबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी उपसभापतींनी मंडळास वाचुन दाखविली. दि. २८.९.९३ रोजी या विषयावर चर्चा होऊन ठराव क्र. ५१० अन्वये असे ठरले होते की, अगोदर बाह्य सुविधांचे हस्तांतरण करून घेतल्यानंतर महानगरपालिकेकडे रक्कम सुपुर्द करावी. या बाबत महानगरपालिकेने अगोदर बाह्य सुविधा हस्तांतरीत करून घेण्यास असमर्थता दर्शविली आहे.

या विषयावर सांगोपांग चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

ठराव क्र. ५३८ दिनांक ४. १. ९४

औरंगाबाद येथील अविष्कार कॉलनी, शुभश्रीकॉलनी, सहयाद्री कॉलनी या तीन कॉलनीचे जलनि:सारण व पाणीपुरवठ्यासाठी शासनाने मंजूर केलेले रु. ४४.०० लाख महानगरपालिकेकडे सुपूर्द करण्यात यावे व ठरल्याप्रमाणे म. न. पा. ने या वसाहती मधील जलनि:सारण व पाणीपुरवठ्याची कामे तात्काळ करावीत. सदर कॉलनी महानगरपालिकेला खालील अटीवर हस्तांतर करण्याचे ठरले.

१] वरील तिनही कॉलनीत जे अतिक्रमण झाले आहे ते अतिक्रमण काढुन देण्याची जबाबदारी कायदेशीररित्या म्हाडावर राहील.

२]अतिक्रमण काढण्यासाठी कांही कायदेशीर बाबी निर्माण झाल्यास व

कामामध्ये नागरीकाने काही अडथळा निर्माण केल्यास ती म्हाडाकडून सोडविण्यांत येईल.

३] सदर कॉलनीमध्ये जलनि:सारण व पाणीपुरवठ्याचे काम चालु असतांना म्हाडाचे कनिष्ठ अभियंता व अन्य आवश्यक अधिकारी वेळोवेळी भेट देतील. अतिक्रमण हटविण्यासाठी सहकार्य करतील व म.न.पा. तर्फे ही कामे पुर्ण करण्यास सर्वतोपरी मदत करतील.

४] सदर कामांमध्ये तेथील राहणाऱ्या नागरीकांनी/लोकांनी कांही अडचणी निर्माण केल्यास त्याची जबाबदारी म्हाडावरच राहील.

वरील प्रमाणे परिस्थिती महानगरपालिकेला कळवावी व ४४.०० लाख रू.चे अनुदान त्यांचेकडे हस्तांतरीत करून द्यावे.

......

मा. श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरू चारठाणाकर, सदस्य औरंगाबाद. मंडळ यांनी मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने "औरंगाबाद येथील सिटीएस क्र. १८३४८/२/२"बाबत दि. ४.६.९३ रोजीच्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावावर पुनश्च चर्चा उपस्थित केली.

श्री. व्यंकटराव देशपांडे यांनी याबाबत असे सांगितले की, सध्या अस्तीत्वात असलेले इमारतीखालील केवळ ९१६ चौ.मी. इतके क्षेत्र संपादनातुन वगळण्याचा ठराव मंडळाने पारीत केला असुन तसा प्रस्ताव प्राधिकरणास पाठविला आहे. तथापी अशा प्रकारे केवळ इमारती खालीलच जमिन संपादनातुन वगळने विकास नियंत्रण नियमानुसार योग्य होईल किंवा कसे याबाबत मा. उपसंचालक नगररचना व मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मत घेण्यांत यावे. त्यावर मा. उपसंचालक व आयुक्त यांनी या जमिनीच्या नकाशाचे अवलोकन करून असे मत व्यक्त केले की, कोणत्याही इमारतीस विकास नियंत्रण नियमानुसार चारही दिशांनी विवक्षीत मोकळी जागा [side-margins]सोडणे आवश्यक आहे. त्यामुळे याही प्रकरणी केवळ इमारतीखालीलच जागा संपादनातुन वगळणे नियमानुसार योग्य होणार नाही. शक्य असल्यास व मंडळाच्या योजनेस बाधा न येता इमारतीच्या चारही दिशांनी विवक्षीत मोकळी जागा सोडुन त्यासह इमारती खालील क्षेत्र संपादनातुन वगळण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत यावा.

मा. उपसभापती यांनी असे सांगितले की, मंडळास ११६.०० चौ.मी पेक्षा जास्त जमिन संपादनातुन वगळणी शक्य नाही. कारण ११६ चौ.मी या क्षेत्र वगळता या संपूर्ण जमिनीचा चटई क्षेत्र निर्देशांक योजना राबविताना वापरण्यात आला आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या मुख्य इमारतीभोवती चारही दिशांनी २.२५ मी. विद्यीत मोकळी जागा [sidemargins] विकास नियंत्रण नियमानुसार आवश्यक झाल्याने इमारती भोवतीची विद्यीत मोकळी जागा गृहीत धरण्यास हरकत नाही तथापी यासाठी चटाई क्षेत्र निर्देशांक केवळ ११६ चौ.मी इतकेच वापरता येईल व यास प्रथम महानगरपालिकेकडून ना हरकत/संजूरी घ्यावी.

तसा सविस्तर प्रस्ताव म.न.पा. कडे पाठविण्यांत येईल आणि त्यानंतर सुधारीत प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत येईल असे मा. उपसभापतींनी सांगितले.

विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर, उपस्थितांचे आभार मानून सभा संपली.

...

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची शुक्रवार दि. १८.२.९४ रोजी होणाऱ्या ९० व्या सभेपुढील विषय.

---

विषय क्र. २: कौठा नांदेड येथील सर्व्हे क्र. ८० वर गृहनिर्माण योजना राबविणेबाबत.

बाब टिप्पणी

सर्व्हे क्रमांक ८० कौठा नांदेड येथील ३.१७ हे. जमिन मंडळाच्या ताब्यात आहे. त्यापैकी ०.२५ हे. जमिन निर्मिती केंद्रासाठी हस्तांतरीत करण्यांत आली आहे. व उर्वरीत जमिनीवर पुर्वी २२२ गाळे अल्प उत्पन्न गट, १ सुविधा भूखंड व १ निर्मिती केंद्र भूखंड अशी संमिश्र योजना प्राधिकरणाकडे प्रशासकीय मान्यतेस्तव या कार्यालयाचे पत्र क्र. ४६११ दि. ९.६.९३ अन्वये सादर करण्यांत आली होती.

प्राधिकरणाने त्यांचे पत्र क्र. ३३१४ दि. ३०.७.९३ अन्वये असे सुचविले होते की, निर्मिती केंद्रावर निव्वळ जमिनीची किंमत [ Bareland Cost ]आकारुन भूविकासाचा खर्च इतर योजनेवर टाकावा परंतु यामुळे अल्प उत्पन्न गटाच्या किंमतीत वाढ होत असल्यामुळे सदर योजना प्रवर्गिकरण करुन मध्यम उत्पन्न गटा अंतर्गत समाविष्ठ करुन सुधारीत प्रस्ताव पाठविण्यांत यावा. या प्रमाणे मंडळाने १९९ मध्यम उत्पन्नगट [अ] गाळ्यांची योजना तयार करुन सुधारीत प्रस्ताव तयार करण्यांत आला होता. याप्रमाणे प्रत्येकी गाळ्याची किंमत रुपये १,३१,२००/- काढण्यांत आली व ही योजना प्राधिकरणाकडे प्रशासकीय मान्यतेस्तव पाठविण्यासाठी सदर योजनेचा मागणी अंदाज आजमाविण्यासाठी दिनांक ११.१०.९३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यांत आली होती. विहीत कालावधीत अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे अर्ज विक्री व स्विकृतीची मुदत दि. ८.१२.९३ पर्यन्त वाढविण्यांत आली होती. तरीही मुदतवाढ करुनही योजनेस १९९ गाळ्यासाठी फक्त ०४ अर्ज प्राप्त झाले आहे. सदर योजनेस मिळालेला अत्यल्प प्रतिसाद पाहता ही योजना कार्यान्वीत करणे शक्य झाले नाही.

या बाबतीमध्ये आता परत मंडळातर्फे पुर्वी प्रस्तावित अल्प उत्पन्न गटा अंतर्गत गाळ्यांच्या नकाशात व आराखड्यात फेरबदल करुन जोडघरे ऐवजी बैठे चाळीतील गाळे [ Row Housing ]व गाळ्याचे भूखंड क्षेत्रफळ ६०.०० चौ.मी. ऐवजी ४०.०० चौ.मी करुन सुधारीत योजना तयार करण्यांत येत आहे व योजनेचे आराखडे व नकाशे व अंदाजपत्रके तयार झाल्यानंतर मागणी अंदाज आजमाविण्यांत येईल.

मंडळाच्या माहितीस्तव सादर.